SAMPLE CONTENT

PRECISE

# मराठी कुमारभारती

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित





सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.


इयत्ता
## दहावी
(मराठी व सेमी इंग्रजी माध्यम)


Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४
यांच्याद्वारे नियोजित अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर (२०१९ - २०) आधारित.

PRECISE

# मराठी कुमारभारती

## इयत्ता दहावी (मराठी / सेमी इंग्रजी माध्यम)

### ठळक वैशिष्ट्ये

- अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- प्रत्येक पाठाखाली भाषाभ्यास विभागाच्या सरावासाठी भरपूर कृती.
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण व लेखन विभाग अंतर्भूत.
- हसतखेळत अभ्यासासाठी 'गंमत जंमत' कृती अंतर्भूत.
- बोर्ड कृतिपत्रिकांमधील कृतींचा उत्तरांसहित समावेश.
- कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज व आवश्यक तेथे पाठाखालील उपक्रमांची उत्तरे Q. R. Code द्वारे समाविष्ट.
- मार्च २०२२ पर्यंतच्या बोर्ड कृतिपत्रिकांमधील निवडक प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश.
- मार्च २०२३ ची बोर्डाची कृतिपत्रिका समाविष्ट. (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.)

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Lazy Bone Education*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 7093

TEID: 2567

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनावादावर आधारित अभ्यासक्रम विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये विकसित करणारा आहे. या अभ्यासक्रमाचा, तसेच सुधारित मूल्यमापन आराखड्याचा सखोल अभ्यास करून **लेझी बोन एज्युकेशनचे PRECISE मराठी कुमारभारती: इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

मुलांनो, शासनाने निर्धारित केलेला हा अभ्यासक्रम भाषेची रुची वाढवणारा व अभ्यासाची कला शिकवणारा आहे. 'घोका आणि ओका' या पाठांतर पद्धतीपेक्षा वेगळा असा हा अभ्यासक्रम भाषिक कौशल्यांचा विकास करणारा असल्यामुळे भाषाज्ञान हे फक्त प्रश्नोत्तरांपुरते मर्यादित न राहता आकलन शक्ती व सर्जनशीलता या क्षमतांचा विकास करणारे ठरेल. विविध प्रकारच्या साहित्यप्रकारांचा आस्वाद देणारा हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना भाषेवर प्रभुत्व मिळवून देण्यास सहाय्यभूत ठरणारा आहे.

या अभ्यासक्रमाचे व अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपाचे बारकाईने विश्लेषण करून आम्ही या पुस्तकाची निर्मिती केली आहे. साहित्यप्रकारानुसार आशय व भाषेमध्ये वैविध्य साधून अभ्यासक्रमाला न्याय देण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे आम्ही केला आहे. पाठाचे अंतरंग जाणून त्यांचा सार विद्यार्थ्यांपर्यंत अचूकपणे पोहोचवण्यास आमचे हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, भाषाशैली विकसित करण्याच्या हेतूने या पुस्तकातील कृतींची रचना करण्यात आली आहे. भाषिक विकास, अभिव्यक्ती कौशल्य आणि सृजनशीलता यांचा विकास साधण्याकरता हे पुस्तक सक्षम आहे अशी आम्हांला खात्री आहे. पुस्तकाची विविध प्रकारची वैशिष्ट्ये पुढील पृष्ठावर विस्तारित स्वरूपात देण्यात आली आहेत. भरपूर सराव, सुटसुटीत मांडणी, आत्मसात करण्यास सोपी व ओघवती लेखनशैली यांमुळे हे पुस्तक तुमच्या पसंतीस उतरेल असा आम्हांला विश्वास आहे.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया. तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय support@lazybone.in या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** तृतीय

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी कुमारभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

Sample Content

# ठळक वैशिष्ट्ये

### अद्ययावत कृतिपत्रिका आराखडा
कृतिपत्रिकेत विचारण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या कृती, त्यांचे गुण, त्यांचा क्रम, विकल्प (options), शब्दमर्यादा इत्यादींबाबत योग्य माहिती पुरवणाऱ्या अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्याचा समावेश यात करण्यात आला आहे.

### कवितेचा भावार्थ
कविता समजण्यास सोपी व्हावी याकरता संपूर्ण कवितेचा भावार्थ देण्यात आला आहे. भावार्थाचे सखोल स्पष्टीकरण देणारे व्हिडिओज प्रत्येक कवितेच्या शेवटी Q. R. Code मार्फत देण्यात आले आहेत.

### शब्दार्थ / वाक्प्रचार
पाठ उत्तमप्रकारे समजण्याकरता त्यातील अवघड शब्दांचे व वाक्प्रचारांचे सोप्या मराठीत अर्थ देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सोयीकरता वर्णमालेच्या क्रमानुसार त्यांची रचना करण्यात आली आहे.

### टिपा
पाठ चांगल्याप्रकारे समजण्याकरता पाठात आलेल्या अवघड संकल्पना (difficult concepts) स्पष्ट करणाऱ्या टिपा वर्णमालेच्या क्रमानुसार देण्यात आल्या आहेत.

### पाठाचे परिच्छेदांमध्ये विभाजन
पाठ चांगल्याप्रकारे समजावा याकरता त्याचे बोर्ड कृतिपत्रिकेच्या आराखड्यानुसार योग्य असे परिच्छेद (passages) पाडण्यात आले असून त्यावर आधारित वेगवेगळ्या कृती भरभरून देण्यात आल्या आहेत.

### पाठाधारित कृती/कवितेवर आधारित कृती
या विभागात संपूर्ण पाठावर/कवितेवर आधारित असलेल्या कृतींचा समावेश करण्यात आला आहे. या कृतीतील उत्तरे संपूर्ण पाठाचा आढावा घेऊन लिहिली गेली आहेत.

### भाषाभ्यास विभाग
भाषाभ्यासाच्या अधिक सरावाकरता प्रत्येक पाठाच्या शेवटी भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती देण्यात आल्या आहेत.

### बोर्ड कृतिपत्रिका
मार्च २०२२ पर्यंतच्या बोर्ड परीक्षांमध्ये विचारलेल्या कृतींचा त्यांच्या उत्तरांसहित समावेश करण्यात आला आहे. मार्च २०२३ ची बोर्डाची कृतिपत्रिका समाविष्ट करण्यात आली आहे. (उत्तरपत्रिका Q. R. Code द्वारे उपलब्ध.)

### उपक्रम
आवश्यक तेथे पाठातील उपक्रमांची (Projects) उत्तरे Q. R. Code मार्फत देण्यात आली आहेत. यामुळे, उपक्रम करताना विद्यार्थ्यांना निश्चितच मार्गदर्शन मिळेल.

### अपठित गद्य आकलन
अपठित गद्याच्या उत्तम सरावाकरता विविध प्रकारच्या कृतींसह भरपूर अपठित उतारे देण्यात आले आहेत.

### स्वतंत्र व्याकरण विभाग
स्वतंत्र व्याकरण विभागात समास, शब्दसिद्धी, लेखननियम, विरामचिन्हे या व्याकरण घटकांचा उदाहरणांसह आढावा घेण्यात आला आहे.

### स्वतंत्र लेखन विभाग
पत्रलेखन, सारांशलेखन, जाहिरातलेखन, बातमीलेखन, कथालेखन, लेखनकौशल्य इत्यादी संदर्भातील पाठाधारित कृती व त्यावर आधारित सरावासाठीच्या कृती यांचा समावेश करण्यात आला आहे.

### थोडासा विरंगुळा
काही पाठांमध्ये थोडासा विरंगुळा या चौकटीमध्ये भाषेची अभिरुची निर्माण करणाऱ्या काही बाबी देण्यात आल्या आहेत.

### गंमत जंमत
मनोरंजक पद्धतीने गमती-जमतीतून मुलांचा अभ्यास घडवून आणण्यासाठी 'गंमत जंमत' या विभागाचा समावेश काही पाठ/कवितांच्या शेवटी करण्यात आला आहे.

### अंतर्गत मूल्यमापन
विद्यार्थ्यांना मार्गदर्शन म्हणून मराठी विषयाच्या तोंडी परीक्षेसंदर्भात अधिक माहिती या भागात समाविष्ट करण्यात आली आहे.

Sample Content

**मराठी कुमारभारती**

**कृतिपत्रिका आराखडा इयत्ता दहावी**

**वेळ : ३ तास** **एकूण गुण: ८०**

## विभाग १ : गद्य — एकूण गुण १८

**(अ) १ पठित उतारा – ७ गुण**
**(आ) १ पठित उतारा – ७ गुण** } १३० ते १५० शब्द
**(इ) १ अपठित उतारा – ४ गुण** – ८० ते १०० शब्द

**(अ) आणि (आ) – ०७ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

| | | |
|---|---|---|
| (१) | आकलन कृती – | २ गुण |
| (२) | आकलन कृती – | २ गुण |
| (३) | स्वमत – | ३ गुण |

**(इ) ४ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

| | | |
|---|---|---|
| (अ) | आकलन कृती – | २ गुण |
| (आ) | आकलन कृती – | २ गुण |

## विभाग २ : पद्य — एकूण गुण १६

**(अ) पठित पद्य** **८ गुण**

पाठ्यपुस्तकात समाविष्ट असणाऱ्या पद्यांपैकी कोणतीही एक कविता कृतिपत्रिकेत देणे.

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

| | | |
|---|---|---|
| (१) | आकलन कृती | २ गुण |
| (२) | आकलन कृती | २ गुण |
| (३) | कवितेतील दिलेल्या कोणत्याही दोन ओळींचा सरळ अर्थ | २ गुण |
| (४) | काव्यसौंदर्य | २ गुण |

(दिलेल्या पद्यातील कोणत्याही २ ओळी देऊन त्यावर काव्यसौंदर्यासाठी योग्य कृती विचारणे)

**(आ) कवितेवरील आधारित कृती विचारणे-** **८ गुण**

'अ' साठी दिलेली कविता सोडून पाठ्यपुस्तकातील कोणत्याही दोन कवितांची फक्त नावे कृतिपत्रिकेत देणे व त्यावर आधारित कृती विचारणे.

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी** –

**१. खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.** **४ गुण**

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री. | १ गुण |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय. | १ गुण |
| (३) | प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा. | २ गुण |
| | (कवितेतील कोणतेही २ शब्द देणे व दोन्ही सोडवणे) | प्रत्येकी १ गुण |
| (४) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा. | २ गुण |
| (५) | प्रस्तुत कवितेची भाषिक वैशिष्ट्ये लिहा. | २ गुण |
| (६) | कवितेतून व्यक्त होणारा विचार लिहा. | २ गुण |
| (७) | कवितेतील दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ लिहा. | २ गुण |
| (८) | प्रस्तुत कविता तुम्हांला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण लिहा. | २ गुण |

**४ गुणांसाठी वरीलपैकी कोणत्याही कृती विचारणे.**

प्रत्येक कृती १ किंवा २ गुणांचीच असावी. १/२ गुणांसाठी कृती विचारली जाऊ नये.

Sample Content

२. **काव्यपंक्तींचे रसग्रहण** **४ गुण**

'अ' व 'आ'साठी दिलेल्या कविता सोडून पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका कवितेतील रसग्रहणास अनुकूल अशा २ किंवा ४ ओळी कृतिपत्रिकेत देणे.

दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ : स्थूलवाचन — एकूण गुण ६

प्रत्येकी ३ गुणांच्या २ कृती

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित)

## विभाग ४ : भाषाभ्यास — एकूण गुण १६

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

१) समास – द्विगू , कर्मधारय, द्वंद्व (वैकल्पिक द्वंद्व, समाहार द्वंद्व, इतरेतर द्वंद्व) २ गुण

२) शब्दसिद्धी – शब्द – प्रत्ययघटित, उपसर्गघटित, अभ्यस्त २ गुण

३) वाक्प्रचार – (४ वाक्प्रचार कृती देणे व त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित) ४ गुण

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

कृतिपत्रिकेत ४ वाक्प्रचार देणे व त्यांपैकी २ सोडविणे अपेक्षित

प्रत्येक वाक्प्रचाराचा अर्थ – १ गुण

प्रत्येक वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग – १ गुण

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

**(१) शब्दसंपत्ती** – ४ गुण

अ) समानार्थी शब्द

ब) विरुद्धार्थी शब्द

क) एकवचन / अनेकवचन
वचन बदला / वचन ओळखा

ड) शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहिणे –
तीन शब्दसमूह देणे त्यांपैकी दोन सोडवणे अपेक्षित

ई) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करणे

} यापैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित

**(२) लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

अचूक शब्द ओळखा – (कोणतेही ६ शब्द प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे, पर्यायातील ४ पैकी एकच शब्द (लेखननियमांनुसार) अचूक असावा. वरील ६ शब्दांपैकी ४ शब्द सोडवणे अपेक्षित

किंवा

वाक्यातील लेखननियमांनुसार चुकीचे शब्द ओळखून दुरुस्त करा. प्रत्येक वाक्यात २ शब्द लेखननियमांनुसार चुकीचे असतील अशी ४ वाक्ये देणे. त्यांपैकी २ वाक्ये सोडवणे अपेक्षित.

**(३) विरामचिन्हे** १ गुण

१) योग्य विरामचिन्हे वापरा.

२) विरामचिन्हे ओळखा.

३) चुकीची विरामचिन्हे बदला.

} यापैकी ०१ गुणासाठी कोणतीही एक कृती विचारणे

**(४) पारिभाषिक शब्द** १ गुण

गद्य, पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित कोणतेही २ पारिभाषिक शब्द देणे व दोन्ही सोडवणे अपेक्षित (प्रत्येक शब्दासाठी १/२ गुण)

Sample Content

| विभाग ५ : उपयोजित लेखन | एकूण गुण २४ |
|---|---|

**(अ)** **६ गुण**

१. **पत्रलेखन**

औपचारिक किंवा अनौपचारिक

मागणी/ विनंती कौटुंबिक

किंवा

२. सारांशलेखन – (विभाग १ गद्य – इ (प्र.१ इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा सारांश लिहिणे)

विभाग १ गद्य – इ (प्र.१ इ) मधील अपठित गद्य उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ)** **१० गुण**

(१) जाहिरात लेखन
(२) बातमी लेखन
(३) कथालेखन

} प्रकारानुसार (६० ते ९० शब्द) } कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे. त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित (प्रत्येकी ५ गुण)

**(ई)** **लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) **८ गुण**

(१) आत्मकथन
(२) वैचारिक
(३) प्रसंगलेखन

} कृतिपत्रिकेत तिन्ही घटकांवर आधारित कृती देणे त्यांपैकी १ सोडवणे अपेक्षित

# कुमारभारती गुणविभागणी

**घटकनिहाय गुणविभागणी**

| अनु. क्र | घटक | गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | १८ गुण | |
| २ | पद्य | १६ गुण | ४ गुण |
| ३ | स्थूलवाचन | ०६ गुण | ३ गुण |
| ४ | भाषाभ्यास | १६ गुण | ४ गुण |
| ५ | उपयोजित लेखन | २४ गुण | ३३ गुण |
| | एकूण गुण | ८० गुण | ४६ गुण |

**अंतर्गत मूल्यमापन – २० गुण**

| | | |
|---|---|---|
| अ. | श्रवण कौशल्य | ०५ गुण |
| आ. | भाषण कौशल्य | ०५ गुण |
| इ. | स्वाध्याय | १० गुण |

*याशिवाय भाषिक घटकांवर आधारित कृतींमध्ये विचारण्यात येणाऱ्या कृतींनुसार काही विकल्प गुण आहेत.

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | जय जय हे भारत देशा | मंगेश पाडगावकर | १ |
| २. | बोलतो मराठी... | डॉ. नीलिमा गुंडी | ३ |
| ३. | आजी: कुटुंबाचं आगळ | महेंद्र कदम | ११ |
| ४. | उत्तमलक्षण | संत रामदास | २० |
| ५ | वसंतहृदय चैत्र | दुर्गा भागवत | २८ |
| • | बालसाहित्यिका – गिरिजा कीर (स्थूलवाचन) | डॉ.विजया वाड | ३७ |
| ६. | वस्तू | द. भा. धामणस्कर | ४३ |
| ७. | गवताचे पाते | वि. स. खांडेकर | ५० |
| ८. | वाट पाहताना | अरुणा ढेरे | ५५ |
| ९. | आश्वासक चित्र | नीरजा | ६४ |
| १०. | आप्पांचे पत्र | अरविंद जगताप | ७१ |
| • | मनक्या पेरेन लागा (स्थूलवाचन) | वीरा राठोड | ७८ |
| ११. | गोष्ट अरुणिमाची | सुप्रिया खोत | ८१ |
| १२. | भरतवाक्य | मोरोपंत | ९३ |
| १३. | कर्ते सुधारक कर्वे | डॉ. शिरीष गोपाळ देशपांडे | १०० |
| १४. | काळे केस | ना. सी. फडके | १०९ |
| १५. | खोद आणखी थोडेसे | आसावरी काकडे | ११६ |
| • | वीरांगना (स्थूलवाचन) | | १२३ |
| १६. | आकाशी झेप घे रे | जगदीश खेबुडकर | १३१ |
| १७. | सोनाली | डॉ. वा. ग. पूर्णपात्रे | १३८ |
| १८. | निर्णय | डॉ. सुनील विभुते | १५३ |
| १९. | तू झालास मूक समाजाचा नायक | ज. वि. पवार | १६३ |
| २०. | सर्व विश्वचि व्हावे सुखी | डॉ. यशवंत पाठक | १७१ |
| • | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन) | | १८० |
| • | अपठित गद्य आकलन | | १८४ |
| | **व्याकरण विभाग** | | १८९ |


Sample Content

| क्र. | पाठाचे नाव | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | उपयोजित लेखन | | |
| १. | पत्रलेखन | | २०१ |
| २. | सारांशलेखन | | २१५ |
| ३. | जाहिरात लेखन | | २१८ |
| ४. | बातमीलेखन | | २२२ |
| ५. | कथालेखन | | २२६ |
| ६. | लेखन कौशल्य | | २३० |
| • | तोंडी परीक्षेविषयी महत्त्वाची माहिती | | २४१ |
| • | बोर्ड कृतिपत्रिका: मार्च २०२३ (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.) | | २४२ |


**[टीप: पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत. ]**

सुधारित कृतिपत्रिका आराखड्यानुसार अभ्यासाला नसलेले पाठ्यपुस्तकातील अभ्यासघटक / प्रश्नप्रकार या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. **उदा.** अलंकार, वृत्त इत्यादी.
स्थूलवाचनातील काही प्रश्नांचे स्वरूपही कृतिपत्रिकेच्या आराखड्यानुसार बदलले आहे.


बोर्डाच्या परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी नमुना प्रश्नपत्रिका सोडवणे हा एक उत्तम मार्ग आहे. शेजारील Q. R. Code स्कॅन करून आमच्या "**SSC 54 प्रश्नपत्रिका व कृतिपत्रिका उत्तरपत्रिकांसहित**' याविषयी जाणून घ्या.

शेवटच्या क्षणी संपूर्ण पुस्तकाचा अभ्यास करणे अवघड वाटते का?
आमच्या "**Important Question Bank (IQB)**' या पुस्तकातून महत्त्वाच्या प्रश्नांची झटपट उजळणी करा. अधिक माहितीकरिता पुढील Q. R. Code स्कॅन करा.

व्याकरण-भाषाभ्यास या विभागात अधिक गुण मिळवायचे असल्यास "**मराठी व्याकरण-भाषाभ्यास**" या पुस्तकाद्वारे सराव करा. या पुस्तकाच्या अधिक माहितीसाठी दिलेला Q. R. Code स्कॅन करा.

उपयोजित लेखन या विभागात अधिक गुण मिळवायचे असल्यास "**मराठी उपयोजित लेखन**" या पुस्तकाद्वारे सराव करा. या पुस्तकाच्या अधिक माहितीसाठी दिलेला Q. R. Code स्कॅन करा.


Sample Content

# २ बोलतो मराठी...

– डॉ.नीलिमा गुंडी

## पाठाची पार्श्वभूमी

प्रस्तुत पाठात लेखिका मराठी भाषा किती समृद्ध आहे हे सांगते. आपल्या जीवनात आपण मराठी भाषेला महत्त्व दिल्यास मनातले भाव त्यातील अर्थसौंदर्यासह सूक्ष्मपणे कसे उलगडतात हे यात सांगितले आहे. तसेच, मराठी भाषेतील विविध शब्दप्रयोगांमुळे विनोदनिर्मिती कशाप्रकारे होते याचे वर्णनही केले आहे. भाषेची गंमत जाणण्यासाठी त्यातील शब्दांची व्युत्पत्ती कशी झाली याचा शोध घेतल्यास खूप रंजक व नवीन माहितीही आपल्याला मिळते हे प्रस्तुत पाठातून लेखिकेने स्पष्ट केले आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| असूया | मत्सर |
| अंगाला लावणे | अंगाला चोपडणे (उटणे, मलम इत्यादी) |
| कलाबूत | चांदीची किंवा सोन्याची तार / दोरा |
| कलेवर | प्रेत, शव |
| ढंग | शैली, पद्धती, रीत |
| पारख | जाण, ओळख |
| पाळेमुळे | खोलवर रुजलेले अस्तित्व |
| रूढ | प्रचलित |
| रांधणे | शिजवणे |
| वार्धक्य | वृद्धत्व, म्हातारपण |
| विकल | असहाय, असमर्थ |
| व्युत्पत्ती | शब्दाचा उगम, निर्मिती |
| शव | प्रेत |
| शक्तिस्थळे | शक्तिस्थान / बलस्थान |
| सूतकताई | चरख्यावर सूत कातणे |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| अर्थाचा अनर्थ होणे | चुकीचा अर्थ लागणे |
| आत्मसात करणे | शिकून घेणे |
| आपले मानणे | आपलेसे करणे |
| अंगाला लावणे | दोष, चूक मान्य करणे |
| अंगावर घेणे | जबाबदारी स्वीकारणे |
| कंठस्नान घालणे | जीवे मारणे, ठार मारणे |
| खस्ता खाणे | खूप कष्ट करणे, खूप हालअपेष्टा सोसणे, श्रम करणे |
| खांद्याला खांदा लावणे | सहकार्य करणे |
| झुगारून देणे | पर्वा न करणे |
| ताव मारणे | मनसोक्त खाणे |
| थापा मारणे | खोट्यानाट्या गोष्टी सांगणे |
| दाद देणे | प्रशंसा करणे |
| फिरकी घेणे | थट्टा उडवणे |
| बेतावर पाणी पडणे | बेत फसणे, रद्द होणे |
| माशा मारणे | वेळ फुकट घालवणे |

## टीप

| | |
|---|---|
| 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी' | सुप्रसिद्ध कवी, गझलकार सुरेश भट यांनी रचलेले हे स्फूर्तिगीत आहे. संगीतकार कौशल इनामदार यांनी या मराठी अभिमान गीतास संगीत दिले आहे. ४५० हून अधिक कलाकारांनी या गीतासाठी आपला आवाज दिला आहे, हे या अभिमानगीताचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. |

## म्हण


| | |
|---|---|
| 'पुराणातील वांगी पुराणात' (मूळ म्हण – पुराणातील वानगी पुराणात) | पुराणातील उपदेश जागच्या जागीच राहतो आणि माणूस स्वत:च्या मर्जीचेच वर्तन करतो. |

### परिच्छेद १

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i.




**उत्तर:** १. पोळ्या लाटणे
२. भाजी फोडणीस टाकणे
३. कढी करणे
४. भात रांधणे
५. कुकर लावणे

Sample Content

ii. 'मार देणे' याव्यतिरिक्त 'मारणे' हे क्रियापद याप्रकारे वापरले जाते

उत्तर: १. गप्पा मारणे २. उड्या मारणे
३. थापा मारणे ४. टिचकी मारणे
५. शिट्टी मारणे ६. पाकीट मारणे
७. जेवणावर ताव मारणे ८. हातपाय मारणे
९. माश्या मारणे

**२. चौकटी पूर्ण करा.**

i. हल्ली पदार्थ तयार करण्याच्या कृतीला असेच संबोधले जाते

ii. 'बनवणे' या शब्दासाठी मराठीत असलेला रूढ अर्थ

उत्तर: i. बनवले ii. फसवणे

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २**
**[परवा वर्तमानपत्रात ................ ................ गंमत असते.]**

**[टीप:** परीक्षेमध्ये संपूर्ण उतारा देण्यात येईल. या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहिणे अपेक्षित आहे. जागेअभावी येथे केवळ उताऱ्याची सुरुवात व शेवट देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी हा उतारा पाठ्यपुस्तकातून वाचावा व त्यावर आधारित प्रश्न सोडवावेत.**]**

### कृती २ – आकलन

**१. चुकीचे विधान ओळखा.**

i. 'बनवणे' हे क्रियापद मराठी भाषेतून आपल्या स्वयंपाकघरात घुसलं आहे.
ii. मराठीत एक क्रियापद वेगवेगळ्या प्रकारे वापरले जाऊ शकते.
iii. मराठी भाषेत वेगवेगळ्या क्रियांसाठी वेगवेगळे शब्दप्रयोग आहेत.
iv. मराठी ढंगाचे शब्दप्रयोग ही आपल्या भाषेची श्रीमंती आहे.

उत्तर: 'बनवणे' हे क्रियापद मराठी भाषेतून आपल्या स्वयंपाकघरात घुसलं आहे.

**२. कारण लिहा.**
**तुम्हांला मी उत्तप्पा बनवू का? यात विनोदनिर्मिती झाली आहे, कारण ..........**

उत्तर: 'बनवणे' हे क्रियापद या वाक्यात शोभणार नाही.

### कृती ३ – स्वमत

**१. मराठी भाषेचे वैभव तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

उत्तर: मराठी भाषेत विविध क्रियांसाठी विविध क्रियापदे आहेत. उदा. रांधणे, लाटणे, शिजवणे, परतणे इत्यादी. तसेच, एखाद्या क्रियापदास वेगवेगळ्या अर्थाने वापरले जाऊ शकते. उदा. 'मारणे' हे क्रियापद खूप वेगवेगळ्या संदर्भात वापरले जाते. जसे, की गप्पा मारणे, उड्या मारणे, थापा मारणे, टिचकी मारणे. या सर्व उदाहरणांत 'मारणे' हे क्रियापद जरी समान दिसत असले; तरी या प्रत्येक मारण्याचा अर्थ मात्र वेगवेगळा आहे. मारणे म्हणजे मार देणे हा अर्थ यात कुठेही आलेला नाही; त्यामुळे, मराठी ढंगाचे शब्दप्रयोग ही मराठी भाषेची संपत्ती आहे.

मराठी ही भाषा लवचीक आहे, ती वळवावी तशी वळते. या भाषेत अनेकविध वाक्प्रचार, म्हणी, अलंकार, सामासिक शब्द आहेत. या सर्वांच्या वापरामुळे भाषेला सौंदर्य मिळते. भाषा समृद्ध होते. शब्दांचे असे वैभव मराठी भाषेत असल्यामुळे मराठी भाषा श्रीमंत आहे असे म्हटले जाते.

## परिच्छेद २

### कृती १ – आकलन

**१. आकृत्या पूर्ण करा.**

*i. भाषा वापरताना अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आवश्यक उपाय

उत्तर: १. शब्दकोशाचा वापर करण्याची सवय लावणे
२. क्रियापद वापरताना नामाला योग्य प्रत्यय लावणे
३. वाक्यात योग्य अर्थाचे क्रियापद वापरणे

ii. हल्ली या ठिकाणी प्रत्ययांची जागा अनेकदा चुकलेली असते

उत्तर: १. सार्वजनिक समारंभांमध्ये
२. वाहिन्यांवर

***२. खालील चौकटी पूर्ण करा.**

i. मराठी भाषेची खास शैली

ii. शब्दांचा अर्थ जाणून घेण्याचे साधन

उत्तर: i. वाक्प्रचार ii. शब्दकोश

Sample Content

> **पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २**
> **[शब्दप्रयोगाप्रमाणे ................**
> **................ असे म्हणायला हवे.]**

### कृती २ – आकलन

**१. योग्य जोड्या जुळवा.**

| क्र. | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | एकाऐवजी दुसरे क्रियापद | अ. | खाद्यपदार्थ नाही. |
| ii. | अक्कलवान | ब. | अर्थाचा अनर्थ |
| iii. | अकलेचा कांदा | क. | हुशार |
| iv. | खस्ता | ड. | अतिशहाणा |

**उत्तर:** (i – ब), (ii – क), (iii – ड), (iv – अ)

**२. खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.**
**अर्थाचा गोंधळ केव्हा होतो?**

**उत्तर:** क्रियापद वापरताना त्यापूर्वी नामाला कोणता प्रत्यय लावायचा असतो, हे नीट माहीत नसले, तर अर्थाचा गोंधळ निर्माण होतो.

### कृती ३ – स्वमत

***१. 'तुम्ही शहाणे आहात' या वाक्यातील 'शहाणे' या शब्दाच्या अर्थछटा लिहा.**

**उत्तर:** 'शहाणे' या शब्दातून दोन अर्थछटा निर्माण होतात. त्यातून सुज्ञ, समजूतदार असा एक अर्थ, तर 'अतिशहाणा' हा दुसरा अर्थ व्यक्त होतो. आपल्या बुद्धीचा योग्य वापर करत सारासार विचार करणाऱ्या व्यक्तीकरता 'शहाणे' असा शब्दप्रयोग केला जातो, तर स्वत:ला हुशार समजून बढाई मारणाऱ्या किंवा स्वभावाने आगाऊ असलेल्या व्यक्तीला 'अतिशहाणा' असे म्हटले जाते. म्हणजेच, पहिल्या अर्थछटेत गुण, तर दुसऱ्या अर्थछटेत दुर्गुण अशा अर्थाने हा शब्द वापरला जातो.

उदा. चांगले वागणाऱ्या, चांगले काम करणाऱ्या मुलाबद्दल बोलताना आई 'माझा बाळ शहाणा आहे' असं म्हणते. आगाऊपणे वागणाऱ्या मनुष्यास 'शहाणा झालास का रे?' किंवा 'तो जरा अतिशहाणाच आहे' असे म्हटले जाते. अशाप्रकारे, 'शहाणे' या एकाच शब्दातून वेगवेगळ्या अर्थछटा निर्माण होतात.

**२. 'वाक्प्रचार ही भाषेची खास शैली असते' यावर तुमच्या शब्दांत लिहा.**


**उत्तर:** 'वाक्प्रचार' म्हणजे शब्दश: अर्थाहून वेगळ्या व विशिष्ट अर्थाने वापरला जाणारा शब्दसमूह होय. भाषेमध्ये काही असे शब्द येतात जे रूढीने किंवा परंपरेने चालत आलेले आहेत. यांना मूळ अर्थापेक्षा वेगळा अर्थ प्राप्त झालेला असतो. हाच अर्थ भाषेत रूढ होतो. उदा. कणिक तिंबणे या वाक्प्रचाराचा अर्थ 'पीठ मळणे' असा नसून 'मार देणे' असा आहे. कणिक तिंबण्याच्या क्रियेत पिठावर जोर देऊन त्याला रगडून मळले जाते यावरून हा वाक्प्रचार मार देणे यासाठी रूढ झाला असावा. त्यामुळे, विविध वाक्प्रचारांचे अर्थ हे वेगवेगळे असू शकतात. या वैविध्यांमुळेच भाषेचे सौंदर्य वाढते. त्यामुळे, वाक्प्रचार ही भाषेची खास शैली असते.

## परिच्छेद ३

### कृती १ – आकलन


**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

***i.**




**उत्तर:** १. भाषेची गंमत जाणून घेता येते.
२. खूप नवी माहिती मिळते.
३. शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली असतात, हे कळते.
४. शब्दांच्या मुळांशी गेल्याने होणाऱ्या चुका टळतात.
५. शब्दाचा उच्चार व त्याची संधी समजल्यावर शब्द मनात पक्का रुजतो.

**ii.**




**उत्तर:** १. संस्कृत २. फारसी ३. अरबी
४. कन्नड ५. इंग्रजी

> **पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २, ३**
> **[भाषेमध्ये अनेक शब्द ................**
> **................ अवलंबून असतो.]**

### कृती २ – आकलन

**१. सत्य विधान ओळखा.**

i. मोरांबा या शब्दातल्या 'मोरा'चा मयूराशी संबंध नाही.

ii. कदर करणे हा वाक्प्रचार 'कद्र' या कन्नड शब्दातून घेतलेला आहे.

Sample Content

iii. अनसूयाचा अर्थ मनात मत्सर असलेली असा आहे.
iv. उच्चारावर अर्थ अवलंबून नसतो.

**उत्तर:** मोरांबा या शब्दातल्या 'मोरा'चा मयूराशी संबंध नाही.

**२. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

**i. लेखिकेच्या मते कोणती गोष्ट करणे योग्य नाही?**

**उत्तर:** गरज नसताना इतर भाषांमधले शब्द मराठी भाषेचे व्याकरण झुगारून वापरणे लेखिकेच्या मते योग्य नाही.

**ii. भाषेची गंमत जाणून घेण्याचा मार्ग कोणता?**

**उत्तर:** शब्दांची व्युत्पत्ती शोधणे हा भाषेची गंमत जाणून घेण्याचा मार्ग आहे.

**iii. 'मोरांबा' या शब्दाच्या व्युत्पत्तीबाबत लेखिकेने काय सांगितले आहे?**

**उत्तर:** पूर्वीच्या काळी साखर मॉरिशसहून येत असे म्हणून साखरेला मोरस म्हटले जात असे व त्यावरून मोरांबा हे नाव पडले. त्यामुळे, 'मोरांबा' शब्दातील मोराचा मोर या पक्ष्याशी काही संबंध नसून साखरेशी संबंध आहे.

### कृती ३ – स्वमत

***१. 'गरज नसताना इतर भाषांमधले शब्द वापरून बोलू नये' या लेखिकेच्या मताबाबत तुमचे मत सोदाहरण लिहा.**

**उत्तर:** भाषा ही नदीसारखी प्रवाही असते. त्यामुळे, ती विविध भाषांमधील शब्दांना सामावून घेते; परंतु काहीही गरज नसताना भाषेची जी सरमिसळ केली जाते ती योग्य नाही असे लेखिकेला वाटते. यासाठी लेखिका एक उदाहरण देते. 'मी स्टडी केली' या मराठी वाक्यात 'स्टडी' या इंग्रजी शब्दाचा वापर करून कोणताही वेगळा अर्थबोध होत नाही. उलट त्या वाक्यातील व्याकरण बिघडते, असे लेखिका म्हणते. लेखिकेचे हे मत मला पटते. माझ्या वर्गातील काही मुले मराठी, इंग्रजी, हिंदी अशी भाषांची सरमिसळ करून बोलतात. यामुळे, होते असे, की कुठल्याही एका भाषेवर त्यांना लक्ष केंद्रित करता येत नाही. कुठलीही भाषा ही जेव्हा तिच्या मूळ स्वरूपात इतर भाषेतील शब्दांना मध्ये न आणता बोलली जाते तेव्हा त्या भाषेचे सौंदर्य खऱ्या अर्थाने उलगडते. असे झाले तरच त्या भाषेवर आपण प्रभुत्व मिळवू शकतो.

## परिच्छेद ४

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**i.** [ ] ← **भाषेत यास महत्त्व असते** → [ ]

**उत्तर:** १. आपण शब्द कसे उच्चारतो
२. आपण कोणत्या अक्षराशी शब्द तोडतो

**ii.** **चुकीच्या ठिकाणी शब्द तोडल्यास अर्थाचा अनर्थ कसा होतो याबाबत लेखिकेने दिलेली उदाहरणे**

सूतकताई → १
अक्षरशः → २

**उत्तर:** १. सूतक ताई २. अक्षर शहा

**iii.** **'कलेवर' शब्दाची चकवणारी दोन शब्दरूपे**

[ ] [ ]

**उत्तर:** १. 'कला' या शब्दाचे सप्तमी विभक्तीचे रूप
२. 'शव' असा अर्थ असणारे नाम

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३**
**[भाषेत आपण शब्द ................**
**................ 'शव' असा आहे.]**

### कृती २ – आकलन

**१. सत्य विधान ओळखा.**

i. पुराणातील वांगी पुराणात या म्हणीचा वांग्याशी संबंध आहे.
ii. 'पुराणातील वानगी पुराणात' अशी मूळ म्हण आहे.
iii. पुराणातील वांगी पुराणातच शोभतात असा या म्हणीचा अर्थ आहे.
iv. वानगीचा अर्थ रवानगी करणे असा आहे.

**उत्तर:** 'पुराणातील वानगी पुराणात' अशी मूळ म्हण आहे.

**२. खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.**
**लेखिकेच्या मते कोणता शोध म्हणजे फुकट उद्योग ठरेल?**

**उत्तर:** 'पुराणातील वांगी पुराणात' या म्हणीचा अर्थ शोधण्यासाठी सगळ्या पुराणांमध्ये वांग्याशी संबंधित गोष्टींचा शोध घेणे म्हणजे लेखिकेच्या मते फुकट उद्योगच ठरेल.

### कृती ३ – स्वमत

**१. भाषेमध्ये व्याकरणाचे महत्त्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**उत्तर:** भाषेतील देवाणघेवाण सुरळीत चालावी व भाषेत नियमितपणा यावा याकरता भाषेचे काही नियम ठरवले जातात. या नियमांनाच व्याकरण म्हटले जाते. दैनंदिन जीवनात भाषा हे आपल्या भावना समोरच्यापर्यंत पोहोचवण्याचे माध्यम असते. व्याकरण या भाषेस सुसंगती आणते. व्याकरणाचे नियम पाळून जेव्हा लिहिले व बोलले जाते, तेव्हा योग्य तो अर्थ

Sample Content

निर्माण होतो. उदा. तो जेवला व ती जेवली हे अनुक्रमे पुल्लिंगी व स्त्रीलिंगी व्यक्तींसाठीच वापरले जाते. लिंग, वचन, काळ, विभक्ती प्रत्यय यांच्या सुयोग्य वापरातूनच अचूक, अर्थपूर्ण साहित्य निर्माण होऊ शकते.

तसेच, भाषेच्या व्याकरणाचा अभ्यास केल्यास आपल्याला आपले विचार नेमकेपणाने मांडता येतात. आपले भाषण कौशल्य, वक्तृत्व सुधारते. उच्चारांतील अचूकपणा, वाक्यातील शब्दांचा अचूक क्रम निवडणे याविषयी योग्य समज तयार होते.

### थोडासा विरंगुळा

सर्वांच्या बोलण्यात सतत येणारे चटकदार वचन म्हणजे म्हण. लोकांना येणारे अनुभवच या म्हणींमधून व्यक्त होत असतात. नेहमी वापरात असलेल्या म्हणींच्या धर्तीवर पण बदलत्या काळाला अनुसरून, आधुनिक संदर्भ घेऊन तयार केलेल्या काही गमतीदार म्हणी तुमच्या मनोरंजनासाठी देत आहोत.

१. नाकापेक्षा चष्मा जड.
२. गोष्ट एक चित्रपट अनेक.
३. न्हाव्यावर रुसला अन् जंगल वाढवून बसला.
४. नाव सुलोचनाबाई, चष्म्याशिवाय दिसत नाही.
५. नाव गंगूबाई, आंघोळीला पाणी नाही.
६. घरावर नाही कौल पण अँटिनाचा डौल.
७. घाईत घाई त्यात चष्मा नाही.
८. प्रयत्ने लाईनीत उभे राहता रॉकेलही मिळे.
९. रात्र थोडी डास फार.
१०. दैव देते आयकर नेते.
११. जेवण नको चार्जर दे.
१२. रेल्वेतून उतरून फलाटावर अडकणे.
१३. बाप लावतो दोन झाडे, मुलगा तोडतो चार झाडे.
१४. उचलले बोट, लागले गूगल करायला.

### परिच्छेद ५

#### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**i.** ☐ ← **भाषेवर प्रेम करण्यासाठी या गोष्टी करायला हव्यात** → ☐

**उत्तर:** १. भाषेतील शक्तिस्थळे जाणून घ्यायला हवीत
२. भाषेचा योग्य सन्मान राखायला हवा

**ii.** ☐ ← **मराठी भाषेने आपल्यासाठी या गोष्टी केल्या आहेत** → ☐

**उत्तर:** १. आपल्या भावजीवनाला आकार दिला आहे
२. आपल्या भावना व्यक्त करायला आधार दिला आहे

**२. चौकट पूर्ण करा.**

**'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी' या अभिमानगीताचे कवी** → ☐

**उत्तर:** कविवर्य सुरेश भट

**३. योग्य पर्याय निवडा.**
आपली भाषा ही हवेसारखी ________
i. आपल्या जीवनात विहरत असते.
ii. सर्वत्र पसरणारी असते.
iii. आपल्याला थंड झुळूक देणारी असते.
iv. आपल्या आतबाहेर असते.

**उत्तर:** आपल्या आतबाहेर असते.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३**
**[आपण आपल्या भाषेवर ................**
**................ विसरून चालणार नाही.]**

#### कृती २ – आकलन

**१. चुकीचे विधान ओळखा.**
i. मराठी भाषेचे ज्ञान आपण मिळवायला हवे.
ii. मराठी भाषेशी आपले जिव्हाळ्याचे नाते असायला हवे.
iii. भाषेमध्ये एका वाक्यातून दोन प्रकारे प्रतिक्रिया देता येत नाहीत.
iv. भाषेचा योग्य सन्मान राखायला हवा.

**उत्तर:** भाषेमध्ये एका वाक्यातून दोन प्रकारे प्रतिक्रिया देता येत नाहीत.

**२. खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.**
**भाषा काय करण्यास मदत करते?**

**उत्तर:** भाषा आपल्या मनातले भाव सूक्ष्मपणे सांगायला मदत करते.

#### कृती ३ – स्वमत

***१. लेखिकेने मराठी भाषेचा केलेला सन्मान तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** लेखिकेच्या मते मराठी भाषा ही आपल्या मातेसमान आहे. या मातृभाषेने आपले भावजीवन घडवले आहे. आपल्याला आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी आधार दिला आहे. तेव्हा तिची ही थोरवी समजून घेऊन तिला सन्मान देणे हे आपले कर्तव्य आहे. आपण आपल्या भाषेवर प्रेम केले पाहिजे. आपल्या या भाषेची शक्तिस्थळे समजून घेऊन भाषेवर प्रभुत्व मिळवले पाहिजे. जर आपण आपल्या भाषेचा खोलवर जाऊन अभ्यास केला, तर त्यातले अर्थसौंदर्य आपल्याला कळेल.

Sample Content

तेव्हाच आपण 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी...' हे कविवर्य सुरेश भटांचे शब्द उच्चारायला पात्र होऊ, अशा शब्दांत लेखिकेने मराठी भाषेचा सन्मान केला आहे.

२. **मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न करू शकता ते लिहा.**

**उत्तर:** माय मराठी म्हणून ज्या भाषेला आपण गौरवले आहे, जिला मातेसमान दर्जा दिला आहे त्या मायबोलीचे संवर्धन करण्यासाठी मला काही गोष्टी कराव्याशा वाटतात.

महाराष्ट्रात प्रत्येक शाळेत मराठी भाषा शिकणे बंधनकारक असावे. असे झाल्यास या राज्यातील प्रत्येक व्यक्ती मराठी शिकेल. यामुळे, निश्चितच या भाषेचा प्रसार व संवर्धन होईल. मी स्वत: मराठीतून संभाषण करताना कटाक्षाने मराठी शब्दच वापरेन. त्यात हिंदी, इंग्रजी शब्दांची सरमिसळ करणार नाही. तसेच, अशाप्रकारे भाषेची सरमिसळ करून संभाषण करणाऱ्यांनाही समजावेन.

भाषेचा प्रसार जसा मौखिक होतो तसाच तो वाचनातूनही होतो, त्यामुळे मी मराठीतील अधिकाधिक समृद्ध ग्रंथांचे वाचन करीन. माझ्या संपर्कातल्या मित्र-मैत्रिणींनाही मराठी भाषेतील साहित्य प्रकारांचे वाचन करण्यास प्रोत्साहन देईन. अशाप्रकारे, मी स्वत: मराठी असल्याचा अभिमान माझ्या कृतीतून व्यक्त करीन. माझ्या भाषेचा सन्मान समाजात राखला जाईल याची सदैव दक्षता घेईन.

## पाठाधारित कृती

*१. **कृती पूर्ण करा.**

मराठी भाषेची श्रीमंती

**उत्तर:** १. मराठी ढंगाचे शब्दप्रयोग
२. शब्दांचे अनेक अर्थ

*२. **चौकट पूर्ण करा.**

मराठी भाषेला लेखिकेने दिलेली उपमा → ☐

**उत्तर:** आईची / हवेची / नदीची

## भाषाभ्यास विभाग

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

१. **खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

i. कामकाज ii. पतीपत्नी
iii. नरसिंह iv. त्रैलोक्य

**उत्तर:**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| i. | कामकाज | काम, काज वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| ii. | पतीपत्नी | पती आणि पत्नी | इतरेतर द्वंद्व समास |
| iii. | नरसिंह | सिंहासारखा नर | कर्मधारय समास |
| iv. | त्रैलोक्य | तीन लोकांचा समूह | द्विगू समास |

२. **खालील शब्दांचे उपसर्गघटित, प्रत्ययघटित व अभ्यस्त असे वर्गीकरण करा.**

सार्वजनिक, पटपट, अनर्थ, प्रतिक्रिया, सूक्ष्मपणा, श्रीमंती

**उत्तर:**

| उपसर्गघटित | प्रत्ययघटित | अभ्यस्त |
|---|---|---|
| अनर्थ, प्रतिक्रिया | सार्वजनिक, सूक्ष्मपणा, श्रीमंती | पटपट |

३. **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. अर्थाचा अनर्थ होणे ii. आत्मसात करणे
iii. आपले मानणे iv. अंगाला लावणे
v. अंगावर घेणे
vi. कंठस्नान घालणे **[मार्च २०१९, २०२०, २०२२]**
vii. खस्ता खाणे
viii. खांद्याला खांदा लावणे ix. झुगारून देणे
x. ताव मारणे xi. थापा मारणे
xii. दाद देणे xiii. फिरकी घेणे
xiv. बेतावर पाणी पडणे xv. माशा मारणे

**उत्तर:**

**i. अर्थाचा अनर्थ होणे** – चुकीचा अर्थ लागणे
**वाक्य:** खरा अर्थ माहीत नसताना एखादा वाक्प्रचार चुकीच्या ठिकाणी वापरला गेला, तर **अर्थाचा अनर्थ होऊ शकतो**.

**ii. आत्मसात करणे** – शिकून घेणे
**वाक्य:** एखादी कला मनापासून आवडली, तर ती **आत्मसात करणे** सोपे होते.

**iii. आपले मानणे** – आपलेसे करणे
**वाक्य:** समाजसुधारकांनी समाजातील वंचितांना **आपले मानले**.

**iv. अंगाला लावणे** – दोष, चूक मान्य करणे
**वाक्य:** रीमा स्वत:च्या चुका कधीच **अंगाला लावून** घेत नाही.

Sample Content

**v. अंगावर घेणे** – जबाबदारी घेणे
**वाक्य:** नलिनीने कार्यक्रमात सूत्रसंचालनाची जबाबदारी **अंगावर घेतली**.

**vi. कंठस्नान घालणे** – ठार मारणे
**वाक्य:** भारताच्या सीमेवर हल्ला करणाऱ्या अनेक दहशतवाद्यांना मेजर परबांनी **कंठस्नान घातले**.

**vii. खस्ता खाणे** – खूप कष्ट करणे
**वाक्य:** मुलीचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी सविताकाकूंनी खूप **खस्ता खाल्ल्या**.

**viii. खांद्याला खांदा लावणे** – सहकार्य करणे
**वाक्य:** आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या **खांद्याला खांदा लावून** काम करत आहेत.

**ix. झुगारून देणे** – पर्वा न करणे
**वाक्य:** पारतंत्र्य **झुगारून देत** सर्व देशवासियांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्योत्सव साजरा केला.

**x. ताव मारणे** – मनसोक्त खाणे
**वाक्य:** आम्ही भेळपुरीवर **ताव मारला.**

**xi. थापा मारणे** – खोट्यानाट्या गोष्टी सांगणे
**वाक्य:** राहुलने शाळेत गैरहजर राहिल्याचे कारण म्हणून आई आजारी असल्याची **थाप मारली**.

**xii. दाद देणे** – प्रशंसा करणे
**वाक्य:** शास्त्रीय गायनाच्या कार्यक्रमात श्रोत्यांनी गायकास भरभरून **दाद दिली**.

**xiii. फिरकी घेणे** – थट्टा उडवणे
**वाक्य:** राजेशच्या भावाला नेहमी समोरच्याची **फिरकी घ्यायची** सवय आहे.

**xiv. बेतावर पाणी पडणे** – बेत फसणे, रद्द होणे
**वाक्य:** अचानक आलेल्या वादळामुळे आमच्या सहलीच्या **बेतावर पाणी पडले**.

**xv. माशा मारणे** – वेळ फुकट घालवणे
**वाक्य:** दिवसभर रामू काहीही काम न करता नुसता **माशा मारत होता.**

## आ. भाषिक घटकांवर आधारित कृती

**१. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| i. | आश्चर्य | ii. | माणूस | iii. | नवरा |
| iv. | बायको | v. | युद्ध | vi. | मदत |
| vii. | नदी | viii. | मयूर | ix. | असूया |
| x. | पाऊस | | | | |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| i. | नवल | ii. | मानव |
| iii. | पती, कांत | iv. | पत्नी, कांता |
| v. | रण, समर | vi. | साहाय्य |
| vii. | सरिता, तटिनी | viii. | मोर |
| ix. | मत्सर | x. | पर्जन्य, वर्षा |

***२. गटात न बसणारा शब्द ओळखून चौकटी पूर्ण करा.**

i. **ऐट, डौल, रुबाब, चैन** → ☐
ii. **कपाळ, हस्त, ललाट, भाल** → ☐
iii. **विनोद, नवल, आश्चर्य, विस्मय** → ☐
iv. **संपत्ती, संपदा, कांता, दौलत** → ☐
v. **प्रख्यात, प्रज्ञा, नामांकित, प्रसिद्ध** → ☐

**उत्तर:** i. चैन ii. हस्त iii. विनोद iv. कांता v. प्रज्ञा

**३. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. | कौतुक × | ii. | सार्वजनिक × |
| iii. | फरक × | iv. | परका × |
| v. | प्रवाही × | vi. | पात्र × |

**उत्तर:** i. निंदा ii. खाजगी iii. साम्य iv. आपला v. अप्रवाही vi. अपात्र

***४. खाली दिलेल्या अनेकवचनी नामांचे एकवचनी रूप लिहून त्यांचा वापर करून प्रत्येकी एक वाक्य तयार करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| i. | रस्ते | ii. | वेळा | iii. | भिंती |
| iv. | विहिरी | v. | घड्याळे | vi. | माणसे |

**उत्तर:**

**i. रस्ते** – रस्ता
**वाक्य:** हा **रस्ता** जिथे संपतो त्या टोकाला एक शंकराचे मंदिर आहे.

**ii. वेळा** – वेळ
**वाक्य:** माझी शाळेतून घरी यायची हीच **वेळ** आहे.

**iii. भिंती** – भिंत
**वाक्य:** चीनची विशाल **भिंत** जगप्रसिद्ध आहे.

**iv. विहिरी** – विहीर
**वाक्य:** ही **विहीर** खूप खोल आहे.

**v. घड्याळे** – घड्याळ
**वाक्य:** बाबांनी वाढदिवसाला मला नवीन **घड्याळ** भेट दिले.

Sample Content

**vi.** **माणसे** – माणूस

**वाक्य:** **माणूस** हा सामाजिक प्राणी आहे.

**५. खालील शब्दांचे वचन बदला.**

i. नदी ii. संगणक
iii. मोर iv. चुका

**उत्तर:** i. नद्या ii. संगणक
iii. मोर iv. चूक

**६. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

i. इथे विनोद निर्माण झाला आहे.
ii. हीच तर भाषेची गंमत आहे.
iii. राजाचे कलेवर प्रेम होते.
iv. कंठस्नान घालणे हा वाक्प्रचार युद्धाविषयीच्या बातम्यांमध्ये असतो.

**उत्तर:** i. इथे **विनोद** निर्माण **झाले आहेत**.
ii. **ह्याच** तर भाषेच्या **गमती आहेत.**
iii. राजाचे **कलांवर** प्रेम होते.
iv. कंठस्नान घालणे हा वाक्प्रचार युद्धाविषयीच्या **बातमीमध्ये** असतो.

***७. खालील शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहा.**

i. पसरवलेली खोटी बातमी –
ii. ज्याला मरण नाही असा –
iii. समाजाची सेवा करणारा –
iv. संपादन करणारा –

**उत्तर:** i. अफवा ii. अमर
iii. समाजसेवक iv. संपादक

**८. खालील शब्दांतील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

i. उदाहरणे ii. अपघातस्थळी
iii. वनमहोत्सव

**उत्तर:** i. दाह, हरणे, हर, दार, दाणे, उर, उणे, उदार
ii. अळी, घात, स्थळी, तप, तळी, पळी, अपघात, पत
iii. वन, महोत्सव, नव, मन, वमन, होम, वाम

**९. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखून लिहा.**

i. शब्दशहा / शब्द:श / शब्दशा / शब्दश:
ii. सार्वजनिक / सावर्जनिक / सार्वजनीक / सावर्जनीक
iii. व्युत्पती / व्युत्पत्ती / वुत्पत्ती / व्युप्तत्ती
iv. स्वंयपाकघर / स्वयपांकघर / स्वैपाकघर / स्वयंपाकघर

**उत्तर:** i. शब्दश: ii. सार्वजनिक
iii. व्युत्पत्ती iv. स्वयंपाकघर

**१०. खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

i. ईथे वीनोद निर्माण झाला आहे.
ii. ति नदीसारखी पर्वाही असते.
iii. पूराणातली वान्गी पुराणात.
iv. भाशेतली शत्किस्थळे माहीत हवी.

**उत्तर:** i. **इथे विनोद** निर्माण झाला आहे.
ii. **ती** नदीसारखी **प्रवाही** असते.
iii. **पुराणातली वांगी** पुराणात.
iv. **भाषेतली शक्तिस्थळे** माहीत हवी.

**११. खालील वाक्यांतील चुकीची विरामचिन्हे ओळखून वाक्ये दुरुस्त करून लिहा.**

i. तुम्हांला मी उत्तप्पा बनवू का!
ii. "अकलेचा कांदा" म्हणजे "अतिशहाणा" हे आपल्याला माहीत हवे.
iii. तो म्हणाला! तू जादूगार आहेस का,
iv. मराठीने आजवर संस्कृत; कन्नड - अरबी, इंग्रजी अशा भाषांतील शब्द घेतले आहेत.

**उत्तर:** i. तुम्हांला मी उत्तप्पा बनवू का?
ii. 'अकलेचा कांदा' म्हणजे 'अतिशहाणा' हे आपल्याला माहीत हवे.
iii. तो म्हणाला, "तू जादूगार आहेस का?"
iv. मराठीने आजवर संस्कृत, कन्नड, अरबी, इंग्रजी अशा भाषांतील शब्द घेतले आहेत.

**१२. खालील पारिभाषिक शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.**

i. Absence ii. Bench
iii. Calligraphy iv. Census
v. Overtime

**उत्तर:** i. अनुपस्थिती ii. आसन, न्यायासन
iii. सुलेखन iv. जनगणना
v. अतिरिक्त काळ

मराठी व्याकरण आणि भाषाभ्यासाची भीती वाटते का?
**'मराठी व्याकरण - भाषाभ्यास'** या पुस्तकाद्वारे अधिक सराव करा आणि अधिक गुण मिळवण्यासाठी पुढील Q. R. Code स्कॅन करा.

Sample Content

Page no. **11** to **188** are purposely left blank.

To see complete chapter buy **Lazy Bone Educations Notes**

Sample Content

# व्याकरण विभाग

## १. समास

रोजच्या जीवनात एकमेकांशी बोलताना, परस्पर विचारांच्या आदानप्रदानाचे काम आपण भाषेच्या माध्यमातून करत असतो. नेहमीची बोलीभाषा व प्रमाणभाषा यांचा वापर आपण व्यवहारात करतो. या भाषेत अनेकदा आपण काही जोडशब्द वापरतो. दोन शब्द एकत्र येऊन एक जोडशब्द बनतो. या जोडशब्दामधले काही शब्द हे गृहीत धरलेले असतात. एका वाक्याचे काम एका शब्दात होत असेल, तर संपूर्ण वाक्य बोलायची किंवा लिहायची आवश्यकता नाही, हे लक्षात ठेवून आपण तो शब्द वाक्याच्या अर्थाने वापरतो. उदा. बटाटे घालून तयार केलेले पोहे हे मोठे वाक्य बोलण्यापेक्षा आपण 'बटाटेपोहे' असे म्हणतो किंवा पुरण घालून तयार केलेली पोळी असे म्हणण्यापेक्षा 'पुरणपोळी' असा शब्दप्रयोग आपण करतो. असे अनेक शब्द आपण सर्रास वापरतो.

अशाच दोन शब्द एकत्र येऊन तयार होणाऱ्या सामासिक शब्दांचा व समासांचा आता अभ्यास करू.

### सामासिक शब्द

**समास :** दोन शब्द एकमेकांशेजारी आले, की त्यांच्यातील परस्परसंबंध दाखवणारे शब्द किंवा प्रत्यय यांचा लोप करून जो एक स्वतंत्र जोडशब्द आपण तयार करतो त्यास **'सामासिक शब्द'** म्हणतात. हा सामासिक शब्द तयार करण्याच्या रीतीला **'समास'** असे म्हणतात.

**विग्रह :** सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्याकरता आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला **'विग्रह'** असे म्हणतात. विग्रह म्हणजे कमीत कमी शब्दांत सामासिक शब्दांचे केलेले स्पष्टीकरण.

'गायरान' हा सामासिक शब्द असून 'गाईसाठी रान' हा त्याचा विग्रह होय. समासात कमीत कमी दोन शब्द येतात. या शब्दांनाच 'पदे' म्हणतात. अर्थाच्या दृष्टीने त्यातील कोणत्या पदाला प्राधान्य आहे, यावर त्या समासाचा प्रकार ठरतो. समासाचे चार प्रकार पडतात.

| क्र. | समासाचे नाव | प्रधान पद | उदाहरण |
|---|---|---|---|
| १. | अव्ययीभाव | पहिले | पदोपदी, आजन्म |
| २. | तत्पुरुष | दुसरे | गायरान, राजवाडा |
| ३. | द्वंद्व | दोन्ही | बरेवाईट, पितापुत्र |
| ४. | बहुव्रीही | अन्य | गजमुख, चंद्रमौली |

यांपैकी आपण कर्मधारय, द्विगू व द्वंद्व (वैकल्पिक द्वंद्व, समाहार द्वंद्व व इतरेतर द्वंद्व) यांचा अभ्यास करणार आहोत.

### कर्मधारय समास

ज्या समासाच्या सामासिक शब्दातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजे प्रथमा विभक्तीत असतात त्यास 'कर्मधारय समास' असे म्हणतात. हा तत्पुरुष समासाचा उपप्रकार आहे.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| महामेरू | महान असा मेरू (पर्वत) |
| चरणकमल | कमळासारखे चरण |
| कमलनयन | कमळासारखे नयन |
| बालमन | बाल असे मन |
| भाषांतर | अन्य भाषा |
| रूपांतर | अन्य रूप |
| पीतांबर | पीत (पिवळे) असे अंबर (वस्त्र) |
| अखंडवंश | अखंड असा वंश |
| परमेश्वर | परम असा ईश्वर |
| पुरुषोत्तम | उत्तम असा पुरुष |
| भवसागर | भव्य असा सागर |
| महासागर | मोठा असा सागर |
| दिव्यदृष्टी | दिव्य अशी दृष्टी |
| प्रतिभाबल | प्रतिभा हेच बल |
| गृहधन | गृह हेच धन |
| समरांगण | समर (लढाई) हेच अंगण |
| क्षमाशास्त्र | क्षमा हेच शास्त्र |

**वैशिष्ट्ये:**

१. दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतात.
२. कधी पूर्वपद विशेषण असते. उदा. नीलकमल
३. कधी उत्तरपद (दुसरे पद) विशेषण असते. उदा. घननीळ
४. कधी दोन्ही पदे विशेषणे असतात. उदा. पांढराशुभ्र
५. कधी पहिले पद उपमान, तर कधी दुसरे पद उपमान असते. उदा. कमलनयन, नरसिंह
६. कधी दोन्ही पदे एकरूप असतात. उदा. विद्याधन

Sample Content

## द्विगू समास

द्विगू समास हा कर्मधारय समासाचा उपप्रकार आहे. या समासातील दोन्ही पदांचा संबंध विशेषण-विशेष्य असा असतो. ज्या समासातील पहिले पद संख्याविशेषण असून त्या सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा अर्थ दर्शवला जातो, त्या समासास 'द्विगू समास' असे म्हणतात. हा समास नेहमी एकवचनी असतो. या समासाला 'संख्यापूर्वपद कर्मधारय समास' असेही म्हणतात.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| त्रिदल | तीन दलांचा समूह |
| त्रिमास | तीन मासांचा (महिन्यांचा) समूह |
| पंचारती | पाच वातींचा समूह |
| पंचवटी | पाच वटांचा (वडांचा) समूह |
| नवरात्र | नऊ रात्रींचा समूह |
| सप्ताह | सप्त (सात) आहांचा (दिवसांचा) समूह |
| आठवडा | आठ दिवसांचा समूह |
| षड्रिपू | सहा रिपूंचा (शत्रूंचा) समूह |
| नवरत्न | नऊ रत्नांचा समूह |
| सप्तर्षी | सात ऋषींचा समूह |
| त्रिकोण | तीन कोनांचा समूह |
| सप्तसूर | सात सुरांचा समूह |
| पंचतत्त्व | पाच तत्वांचा समूह |
| पंचपक्वान्ने | पाच पक्वान्नांचा समूह |
| अष्टांग | आठ अंगांचा समूह |

**वैशिष्ट्ये:**

१. द्विगू समासात पूर्वपद संख्यावाचक असते.

२. हा समास नेहमी एकवचनात असतो.

३. सामासिक शब्दावरून एका समुच्चयाचा बोध होतो.

## द्वंद्व समास

ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या समान दर्जाची असतात, त्यास 'द्वंद्व समास' असे म्हणतात. ही पदे '**आणि, व**' अशा समुच्चयबोधक तर '**अथवा, किंवा**' अशा विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असतात.

**उदा.** रामलक्ष्मण – राम आणि लक्ष्मण
पापपुण्य – पाप किंवा पुण्य

**द्वंद्व समासाचे तीन प्रकार आहेत.**

१. इतरेतर द्वंद्व

२. वैकल्पिक द्वंद्व

३. समाहार द्वंद्व

### १. इतरेतर द्वंद्व:

ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास 'इतरेतर द्वंद्व समास' असे म्हणतात. जसे,

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| हरिहर | हरी आणि हर |
| कटिखांदी | कटी आणि खांदी |
| लेकीसुना | लेकी आणि सुना |
| हातपाय | हात आणि पाय |
| बहीणभाऊ | बहीण आणि भाऊ |
| नवराबायको | नवरा आणि बायको |
| मायलेक | माय आणि लेक |
| नरनारी | नर आणि नारी |
| पापताप | पाप आणि ताप |
| नेआण | ने आणि आण |
| कपबशी | कप आणि बशी |
| आवडनिवड | आवड आणि निवड |
| दिवसरात्र | दिवस आणि रात्र |
| लुळापांगळा | लुळा आणि पांगळा |

**वैशिष्ट्ये:**

१. अर्थासाठी दोन्ही पदांची अपेक्षा असते.

२. या समासाचा विग्रह करताना आणि व ही समुच्चयबोधक अव्यये घालावी लागतात.

### २. वैकल्पिक द्वंद्व:

ज्या समासाचा विग्रह करताना 'अथवा', किंवा 'वा' या विकल्प दाखवणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो, त्यास 'वैकल्पिक द्वंद्व समास' असे म्हणतात.

**उदा.** खरेखोटे – खरे किंवा खोटे

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| बरेवाईट | बरे किंवा वाईट |
| भलेबुरे | भले किंवा बुरे |
| काळागोरा | काळा किंवा गोरा |
| पासनापास | पास किंवा नापास |
| पापपुण्य | पाप किंवा पुण्य |
| आठपंधरा | आठ किंवा पंधरा |
| पाचपन्नास | पाच किंवा पन्नास |
| स्पृशास्पृश्य | स्पृश्य किंवा अस्पृश्य |
| आजकाल | आज किंवा काल |
| मानापमान | मान किंवा अपमान |
| यशापयश | यश किंवा अपयश |

Sample Content

**वैशिष्ट्ये:**

१. दोन्ही प्रधान पदांपैकी एकाचीच अपेक्षा असते.

२. समासाचा विग्रह करताना वा, किंवा, अथवा यांपैकी एखादे विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय घालावे लागते.

**३. समाहार द्वंद्व:**

ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो, त्यास 'समाहार द्वंद्व' असे म्हणतात.

**उदा.** भाजीपाला – भाजी, पाला, मिरची, कोथिंबीर इत्यादी.

| सामासिक शब्द | विग्रह |
|---|---|
| बाजारहाट | बाजार, हाट वगैरे |
| केरकचरा | केर, कचरा वगैरे |
| कपडालत्ता | कपडा, लत्ता वगैरे |
| पानपत्रावळ | पान, पत्रावळ वगैरे |
| ख्यालीखुशाली | ख्याली, खुशाली वगैरे |
| वास्तपुस्त | वास्त, पुस्त वगैरे |
| मुलंबाळं | मुलं, बाळं वगैरे |
| शेतीवाडी | शेती, वाडी वगैरे |
| पैसाअडका | पैसा, अडका वगैरे |
| गुरंढोरं | गुरं, ढोरं वगैरे |
| लग्नकार्य | लग्न, कार्य वगैरे |
| अन्नवस्त्र | अन्न, वस्त्र वगैरे |
| सोनेनाणे | सोने, नाणे वगैरे |
| नोकरचाकर | नोकर, चाकर वगैरे |

**वैशिष्ट्ये:**

१. समासातील पदांचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्यात जातीच्या इतर पदार्थांचाही समावेश केलेला असतो.

२. समासात आलेल्या आणि त्या जातीच्या इतर वस्तूंच्या समुदायाला महत्त्व असते, म्हणून हा समास एकवचनी असतो.

## सरावासाठी प्रश्न

**१. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समासांची नावे लिहा.**

i. सप्तनद्या ii. वीरमरण iii. पंचप्राण
iv. पंधरवडा v. पाचसहा vi. मुखकमल

**उत्तर:**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| i. | सप्तनद्या | सात नद्यांचा समूह | द्विगू समास |
| ii. | वीरमरण | वीर असे मरण | कर्मधारय समास |
| iii. | पंचप्राण | पाच प्राणांचा समूह | द्विगू समास |
| iv. | पंधरवडा | पंधरा दिवसांचा समूह | द्विगू समास |
| v. | पाचसहा | पाच किंवा सहा | वैकल्पिक समास |
| vi. | मुखकमल | मुख हेच कमल | कर्मधारय समास |

**२. खालील समासांची दोन-दोन उदाहरणे लिहा.**

i. द्विगू समास ii. कर्मधारय समास
iii. इतरेतर द्वंद्व iv. वैकल्पिक द्वंद्व
v. समाहार द्वंद्व

**उत्तर:** i. चतुर्वेद, तिपेडी, सप्तस्वर्ग
ii. मंदबुद्धी, महाराष्ट्र
iii. दिवसरात्र, तहानभूक
iv. पाचपन्नास, खरेखोटे
v. चहापाणी, गुरेढोरे

**३. खालील वाक्यांतील सामासिक शब्द ओळखा व त्यांचा विग्रह करून समासाचे नाव लिहा.**

i. चातुर्मास हा पवित्र महिना आहे.
ii. अर्जुनाचा संघर्ष धर्माधर्म याविषयी नव्हता.
iii. घरात लग्नकार्य असेल, तर धांदलच उडते.
iv. ते महायुद्ध भीषण होते.
v. हातपाय धड असतील, तर भीक मागण्याची वेळ का येते?

**उत्तर:**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | चातुर्मास | चार मासांचा/महिन्यांचा समूह | द्विगू समास |
| ii. | धर्माधर्म | धर्म किंवा अधर्म | वैकल्पिक द्वंद्व समास |
| iii. | लग्नकार्य | लग्न, कार्य, समारंभ वगैरे | समाहार द्वंद्व समास |
| iv. | महायुद्ध | महान असे युद्ध | कर्मधारय समास |
| v. | हातपाय | हात आणि पाय | इतरेतर द्वंद्व समास |

**४. खालील तक्ता पूर्ण करा.**

| क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| i. | | तीन भुवनांचा समूह | |
| ii. | | काव्यरूपी अमृत | कर्मधारय |
| iii. | राधाकृष्ण | | इतरेतर द्वंद्व |
| iv. | द्विदल | | द्विगू |
| v. | | अ. गुण किंवा दोष | वैकल्पिक द्वंद्व |
| | | ब. गुण आणि दोष | इतरेतर द्वंद्व |

Sample Content

Page no. **192** to **200** are purposely left blank.

To see complete chapter buy **Lazy Bone Educations Notes**

Sample Content

# १ पत्रलेखन

पत्रलेखन ही एक कला मानली जाते. आपल्या मनातील भाव किंवा विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना किंवा विचारांना चांगल्या भाषेत संक्रमित करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

## पत्रलेखनाची गरज

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांचा वापर करणे सहज शक्य झाल्याने प्रत्यक्ष पत्रलेखनाची गरज बऱ्याच प्रमाणात कमी झालेली असली तरी पत्रलेखनाकरता नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे ही आता काळाची गरज बनली आहे.

अनौपचारिक पत्राद्वारे आपल्या भावना प्रभावीपणे व्यक्त करता येणे तसेच औपचारिक पत्राद्वारे आपले म्हणणे, विचार, मागणी, विनंती इत्यादी बाबी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचवणे हे अत्यंत महत्त्वाचे लेखन कौशल्य आहे. हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखन करणे आवश्यक आहे.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| | औपचारिक | | अनौपचारिक |
|---|---|---|---|
| १. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा. | १. | व्यक्तीचा उल्लेख योग्य प्रकारे, नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक करावा. |
| २. | पत्राचा मूळ विषय थोडक्यात लिहावा. | २. | पत्राचा विषय लिहिण्याची आवश्यकता नसते. |
| ३. | अचूक आणि मोजक्या शब्दांत नेमका आशय लिहावा लागतो. | ३. | व्यक्तीची खुशाली विचारावी. |
| ४. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. | ४. | भावना प्रभावी शब्दांत मांडाव्यात, तसेच नात्यातील जिव्हाळा व्यक्त करणारे लेखन करावे. |
| | | ५. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा. |

[**टीप:** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)]

## पत्रलेखनाचे प्रकार

यावर्षीच्या अभ्यासक्रमानुसार आपण खालील पत्रप्रकार अभ्यासू.

**पत्रलेखन**

- अनौपचारिक
  - जवळच्या, जिव्हाळ्याचे नाते असणाऱ्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
    - कौटुंबिक पत्र
- औपचारिक
  - कार्यालयीन व व्यावसायिक कामकाजानिमित्त पाठवले जाणारे पत्र
    - मागणी पत्र
    - विनंती पत्र इत्यादी

Sample Content

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक ________

प्रति, ________
माननीय ________ ,

विषय: ________

महोदय, ________

मुख्य मजकूर

आपला / आपली

__________

पत्ता

__________

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## पत्रलेखन नमुना कृती

*१.



**वाचनम् हितकारकम्!**

**आनंद पुस्तकालय**

१०२, विकास नगर, गाळा नं. २, जालना

anandpustakalaya@gmail.com

सवलत दिनांक
१ नोव्हें ते १५ नोव्हें

दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त
**खास आकर्षण**
कोणत्याही पुस्तकावर २०% सवलत

वेळ: सकाळी १० ते रात्री ८ सोमवारी बंद

**रसिक वाचक या नात्याने संबंधित व्यक्तीला स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**शालेय भांडार प्रमुख या नात्याने संबंधित व्यक्तीला शाळेसाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत देण्याविषयी विनंती करणारे पत्र लिहा.**

Sample Content

**उत्तर:**

**i. मागणी पत्र (औपचारिक)**

दिनांक १ नोव्हेंबर २०२२

प्रति,

श्री. यदुनाथ चाफेकर
माननीय व्यवस्थापक,
आनंद पुस्तकालय
१०२, विकास नगर,
गाळा नं. २,
जालना - ××××××
anandpustakalaya@gmail.com

**विषय:** पुस्तकांच्या मागणीबाबत.

महोदय,

सर्वप्रथम, आनंद पुस्तकालयाच्या वर्धापन दिनानिमित्त आपणा सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा!

मी कुमारी अ.ब.क. एक रसिक वाचक या नात्याने आपल्या आनंद पुस्तकालयातून माझ्या आवडीची पाच पुस्तके मागवू इच्छिते. पुस्तकांची यादी सोबत जोडत आहे. तरी ही सर्व पुस्तके लवकरात लवकर दिलेल्या पत्त्यावर पोहोचवल्यास आनंद होईल. सोबत बिलही पाठवावे म्हणजे बिलाची रक्कम घरपोच सेवा उपलब्ध झाल्यावर त्वरित देता येईल. आपण या पुस्तकांवर योग्य ती सवलत द्याल असा विश्वास आहे.

पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| १. | श्यामची आई | पांडुरंग सदाशिव साने | २ |
| २. | ययाती | वि. स. खांडेकर | १ |
| ३. | देह झाला चंदनाचा | राजेंद्र खेर | ३ |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | प्रती |
|---|---|---|---|
| ४. | शास्त्रीय मराठी व्याकरण | मोरो केशव दामले | १ |
| ५. | सावित्री | पु. शि.रेगे | १ |

कृपया, पुस्तके लवकरात लवकर पाठवावीत ही नम्र विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,
अ.ब.क.
बी-४०१, श्रीगणेश अपार्टमेंट,
वझिरानाका, बोरीवली (प.)
मुंबई - ××××××
abc@xyz.com

**किंवा**

**ii. विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक २ नोव्हेंबर २०२२

प्रति,

श्री. यदुनाथ चाफेकर
माननीय व्यवस्थापक,
आनंद पुस्तकालय
१०२, विकास नगर,
गाळा नं. २,
जालना - ××××××
anandpustakalaya@gmail.com

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Med.)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोदः सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्दः संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  • Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोदः (सम्पूर्ण-संस्कृतम्) SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्दः (संयुक्तम्) SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

Visit Our Website



Address: 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
Tel: 88799 39712 / 13 / 14 / 15 • Website: www.targetpublications.org • Email: mail@targetpublications.org